# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

**शासकीय तंत्रनिकेतन, सामनगांव रोड नाशिक-रोड ,नाशिक**

**☎ : 2461479, Fax : 2455301 ई-मेल:- ronashik.dte@gmail.com.**

**www.dtensk.org**


---

जा.क्र.तंशि/विकाना/तांशा/२०१०/ 1671 दिनांक :- 21 SEP 2010

प्रति,
प्राचार्य,
सर्व विनाअनुदानित
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र,
एच.एम.सी.टी.पदविका संस्था,
नाशिक विभाग

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये पदविका स्तरावरील **केदीभुत प्रवेश प्रक्रियेव्दारे** प्रथम वर्षासाठी प्रवेश देण्यात आलेल्या व थेट व्दितीय वर्षाकरीता प्रवेश देण्यात आलेल्या विदयार्थ्याच्या अंतिम गुणवत्ता यादया मान्यतेसाठी सादर करण्याबाबत

उपरोक्त विषयास अनुसरून इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी नंतरच्या अभियांत्रिकी व इतर तत्सम पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची शैक्षणिक वर्ष २०१०-११ करीता प्रथम वर्षासाठी केंद्रीभूत व संस्थास्तरावर प्रवेश नियमावली संचालनालयाच्या **www.dte.org.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आपणांस सूचित करण्यात येते की, आपल्या संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रियेचे माहितीपुस्तक शैक्षणिक वर्ष २०१०-११ मधील प्रवेश नियमावली नुसार संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेच्या कार्यक्रमानुसार प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया पार पाडण्यात आलेली असेलच तसेच आपल्या संस्थेचे प्रवेशाच्या नियमावलीनुसार माहितीपुस्तक व प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर करणे बंधनकारक असल्याने प्रवेशाबाबतचे वेळापत्रक या कार्यालयांस माहितीस्तव सादर करण्यात यावे.

त्याअनुषंगाने आपल्या संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०१०-११मध्ये संस्था स्तरावरील प्रथम वर्षासाठी व व्दितीय वर्षासाठी प्रवेश दयावयाच्या विद्यार्थ्याची अंतिम गुणवत्ता यादी (**General Merit List**) सोबतच्या प्रपत्रात सादर करावी. तसेच केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेव्दारे व संस्था स्तरावर प्रवेशित विदयार्थ्याची तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेत स्थळावर अपलोड केलेली शाखानिहाय यादी तयार करून **दिनांक २४ सप्टेंबर २०१०** पर्यत सादर करून तपासणीसाठी या कार्यालयाकडून दिनांक निश्चित करून घ्यावा. प्रवेशित विदयार्थ्याची यादी सादर करतेवेळी संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१०-११ करीता अभ्यासक्रमासाठी मान्यता देण्यात आलेल्या किंवा मुदतवाढी व प्रवेशक्षमता वाढ संदर्भातील शासनाच्या/संचालनालयाच्या,अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या, तसेच औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी फार्मसी

कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली, आपल्या संस्थेस निर्धारीत केलेल्या शिक्षण शुल्काबाबत शिक्षणशुल्क समितीचा आदेश सन २००९-१० व २०१०-११ या शैक्षणिक वर्षात नव्याने मान्यता प्राप्त संस्थानी परवानगी पत्रात विहित केलेल्या रक्कमेच्या मुदत ठेवीच्या पावत्याची झेराक्स प्रती इत्यादी दस्तावेजाच्या छायांकित प्रती साक्षांकनासह या कार्यालयास सादर करण्यात याव्यात. तसेच प्रवेशाबाबतची जाहिरात, प्रवेश नियमावली व अर्जाचा नमुना, प्रवेशाचे वेळापत्रक, विदयार्थ्यांकडून आकारण्यात आलेल्या शिक्षण शुल्काची पावती, अंतिम गुणवत्ता यादी, वेळापत्रकानुसार प्रवेशाकरीता उपस्थित विदयार्थ्यांचे उपस्थितीपत्रक इत्यांदी कागदपत्रे सादर करावीत. प्रत्यक्ष तपासणीच्या वेळी प्रवेशासाठी अर्ज केलेल्या सर्व विदयार्थ्यांचे अर्ज, संस्थास्तरावर अर्ज स्विकृतीबाबत ठेवण्यात आलेली नोंदवही, अर्ज केलेल्या सर्व विदयार्थ्यांची तात्पुरती गुणवत्ता यादी तसेच प्रवेशित विदयार्थ्यांची सर्व मुळ कागदपत्रे गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र, गॅप सर्टिफिकेट तसेच इतर मागासवर्गीय,एन.टी. १, एन.टी.२, व एन.टी. ३, व्ही.जे./डी.टी.,एस.बी.सी.या विदयार्थ्यांचे विहीत मुदतीतील (३१ मार्च २०११ पर्यन्त व्हॅलीड असलेले ) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे संलग्नीकरण प्रमाणपत्र इत्यादी **सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षापासून नव्याने सुरु झालेल्या संस्थानी मुदत ठेवीची पावतीची प्रत,यंत्रसामुग्री, फर्निचर ग्रंथालयातील पुस्तके इत्यादीच्या यादया** तपासणीसाठी सादर करावीत. यादया तपासणीकरीता सदर कामातील माहिती असलेले संस्थेतील जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांना पाठविण्यात यावे जेणेकरुन यादया तपासणीच्या वेळी काही त्रुटी असल्यास, त्यांचे निराकरण करणे शक्य होवून यादया तपासणीचे काम वेळेत पुर्ण करणे शक्य होईल.

आपल्या संस्थेबाबत फी परतावा किंवा प्रवेशाबाबत काही तक्रारी असल्यास त्याचे निराकरण झालेले असल्याची खात्री करुन घ्यावी. विदयार्थ्यांच्या तक्रारीबाबत या कार्यालयात स्वतंत्र नोंदी ठेवण्यात आलेल्या असुन, सदर तक्रारींचे संपूर्ण निराकरण झाल्याशिवाय आपल्या संस्थेची प्रवेशित विदयार्थ्यांची यादी प्रमाणित करण्यात येणार नाहीत व नियमबाहय दिलेले प्रवेश रदद करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

तसेच गुणवत्ता यादी सादर करतांना संस्थास्तरावरील प्रवेशित विद्यार्थ्यांची सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्रानुसारच अंतिम गुणवत्ता यादी, तसेच संस्थेसंबंधातील इतर माहिती विहीत प्रपत्रात सादर करावी. तसेच संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रवेशित विदयार्थ्यांची माहिती अपडेट करुन त्याची प्रत तपासणीच्या वेळी सादर करावी. तसेच संचालनालयाच्या **www.dte.org.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असलेले माहितीचे प्रपत्रे इन्स्टिटयुट लॉगीग

करून एमएचआरडीच्या संबंधातील **दिनांक ३० सप्टेंबर २०१०** पर्यतची सांख्यिकी माहिती अपडेट करण्यात येवून त्याची प्रतही सोबत सादर करण्यात यावी.

ज्या विनाअनुदानित संस्थामध्ये सेंकड शिफट मध्ये अभ्यासक्रम चालू आहे.त्या संस्थानी नियमित व सेंकड शिफट अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेबाबतची स्वंतत्र माहिती सादर करावी.

तसेच आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून  नविन अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी किंवा सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ अथवा घट करण्यासाठी अर्ज केलेले असतील तर त्यासंबंधीचा मंजूरीचा शासन निर्णय प्राप्त झाल्यावरच सदर अभ्यासक्रमासाठी प्रवेशाबाबतची कार्यवाही करण्यात यावी. तसेच आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१०-११ करीता सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना मुदतवाढ मिळणेसाठी सादर केलेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने एआयसीटीई / शासनाकडून मुदतवाढीबाबतचा अंतिम मंजुरीचा आदेश प्राप्त झाल्याची खात्री करुन त्यानुसारच मंजूर प्रवेशक्षमतेत प्रवेश निश्चित करावेत.

सोबत:-सहपत्रे एकूण १२

**(दि.रा.नंदनवार)**
**सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

D:\TANSHA\Diploma 1-9-2009\Dip.Admiss.letter,Inst 2009-10.doc